# RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act No. VI of 2017).)"

**Office of the Director, Board of Examination and Evaluation**
**(Ph.D. Cell)**
**Examination Bhawan, Laxminarayan Institute of Technology Premises,**
**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur-440033**

No. RTMNU/Ph.D. Cell./Ph.D. Registration-2019-2020/ 587 Dated 03/09/2019

## आचार्य पदवी नोंदणी : परिपत्रक

विषय: **आचार्य पदवीसाठी नोंदणी करण्याच्या दृष्टीने आवेदन पत्र सादर करण्यासाठी विद्यार्थी, मार्गदर्शक, संशोधन स्थळ यांनी घ्यावयाच्या आवश्यक कार्यवाही संदर्भात सविस्तर माहिती**

अ) <u>विद्यार्थ्यांकरीता सूचना</u> :

१) आचार्य पदवी नोंदणी संदर्भात निर्गमित निर्देश कमांक ३२/२०१९ मधील तरतूदीनुसार आचार्य पदवीसाठी नोंदणी करणा–या विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी प्रवेश परीक्षा (Ph.D. Entrance Test-I and II) उत्तीर्ण केली आहे आणि ज्या विद्यार्थ्यांना निर्देशातील खालील तरतूदीनुसार प्रवेश परीक्षेपासून सुट प्राप्त आहे असे सर्व विद्यार्थी मान्यताप्राप्त संशोधन स्थळ प्रमुखांच्या नावाने संबधित महाविद्यालयात आचार्य पदवीसाठी मार्गदर्शक पुरविण्याबाबत आवेदन सादर करतील.

सबंधित संशोधन स्थळातील संशोधन स्थळ प्रमुखांनी Supervisor Allotment Committee मार्फत मार्गदर्शक उपलब्ध करून दिल्यानंतर आराखडा तयार करून आराखडयास संबधित संशोधन स्थळाने गठीत केलेल्या Research Advisory Committee ची मान्यता प्राप्त झाल्यानंतर आचार्य पदवी आवेदनपत्र शुल्क रू. १०००/– ऑनलाईन जमा करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मान्यताप्राप्त संशोधन स्थळ असलेल्या महाविद्यालयाची यादी Ph.D. Portal वर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

Exemption from PET: Candidates who have qualified the UGC-NET (Including JRF)/ UGC-CSIR NET (including JRF)/GATE/GPAT/SET/ teacher fellowship holder or have passed M.Phil programme (admitted through entrance test) in the concerned subject from any Statutory University)

२) उपरोक्त प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर दिनांक २४.१०.२०१९ ते ६.११.२०१९ या कालावधीत ऑनलाईन आवेदन पत्र सादर करून ऑनलाईन आवेदनाच्या हार्डकॉपीवर संशोधन स्थळ प्रमुख आणि मार्गदर्शकाची स्वाक्षरी घेऊन आवश्यक कागदपत्रांसह आचार्य पदवी कक्षात दिनांक १६.११.२०१९ पर्यंत संध्याकाळी ५.३० पर्यंत सादर करणे आवश्यक राहील. निर्धारित कालावधी संपुष्टात आल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत आचार्य पदवी नोंदणी आवेदन स्वीकार करण्यात येणार नाही.

३) ऑनलाईन आवेदन **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर Ph.D. Portal **Ph.D. Registration** या नावे सुरू करण्यात आलेल्या उप–संकेत स्थळावर ऑनलाईन आवेदनपत्र दिनांक २४.१०.२०१९ ते ६.११.२०१९ पर्यंत उपलब्ध करून देण्यात येईल.

४) आचार्य पदवी नोंदणीसंदर्भात निर्गमित निर्देश क्रमांक ३२/२०१९ विद्यापीठ संकेतस्थळ **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर **Ordinance/Direction** या उप–संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. करीता सर्व संबधितांनी निर्देशाचे काळजीपूर्वक प्रथम वाचन करून समजून घ्यावे.

५) मार्गदर्शक पदव्युत्तर शिक्षक मान्यताप्राप्त असणे आवश्यक असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुचनेनुसार मार्गदर्शक संबधित संशोधनस्थळात नियमित शिक्षक म्हणून कार्यरत असणे आवश्यक आहे. मार्गदर्शक आणि संशोधन स्थळ एकच राहील. मार्गदर्शक आणि संशोधन स्थळ भिन्न राहणार नाही याची संबधितांनी नोंद घ्यावी.

६) आचार्य पदवी नोंदणी प्रवेशासंदर्भात संशोधन स्थळ असलेल्या महाविद्यालयांकडून कोणत्याही प्रकारचे सहकार्य प्राप्त होत नसेल तर संबधित विद्यार्थ्यांनी संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, परीक्षा भवन, लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, अमरावती रोड, नागपूर–४४००३३ यांच्याकडे प्रत्यक्ष भेट देऊन लेखी स्वरूपात तक्रार नोंदवावी. मौखिक किंवा निनावी तक्रार ग्राहय धरण्यात येणार नसून अश्या तक्रारीवर कोणतीही कार्यवाही घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.

७) आचार्य पदवी नोंदणी करण्याकरिता संशोधन स्थळाकरिता आकारण्यात येणारे शुल्क निर्धारित करण्यात आलेले असून त्याबाबतची अधिसूचना क्रमांक No. RTMNU/16/3389, dated 4th February 2016 निर्गमित करण्यात आलेली असून अधिसूचनेची प्रत विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

८) ज्या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर गुणपत्रिका इतर विद्यापीठाची असेल त्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सामान्य परीक्षा व चौकशी विभागाकडे रितसर अर्ज सादर करून पात्रता प्रमाणपत्र/समकक्षता प्रमाणपत्र (Eligibiliy Certificate/ Equivalence Certificate) प्राप्त करून आवेदनपत्रासोबत प्रमाणपत्र/समकक्षता प्रमाणपत्र (Eligibiliy Certificate/ Equivalence Certificate) संलग्न करणे बंधनकारक आहे. तसेच विद्यापीठ परिक्षेत्रात वास्तव्य करीत असल्याचा (Residence Affidavit) रू. १००/– स्टॅम्प पेपरवर देणे बंधनकारक आहे.

**ब) संशोधन स्थळ असलेल्या महाविद्यालयांसाठी आवश्यक सुचना :**

१) ज्या महाविद्यालयांना ज्या ज्या विषयात संशोधन स्थळ म्हणून मान्यता मिळालेली आहे त्या विषयात रिक्त असलेल्या जागांची माहिती व त्या विषयात उपलब्ध असलेल्या मार्गदर्शकाची व त्यांच्याकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती महाविद्यालयाच्या सुचना फलकावर प्रकाशित करून सदर यादी दिनांक २३.९.२०१८ पूर्वी आचार्य पदवी कक्षाकडे पडताळणी करण्याकरिता पाठवावी. आचार्य पदवीसाठीचे मार्गदर्शक संबधित महाविद्यालयात कार्यरत असणे आवश्यक आहे.

२) ज्या मार्गदर्शकांना सेवानिवृत्तीकरिता तीन वर्षापेक्षा कमी कालावधी असेल अशा मार्गदर्शकांना मार्गदर्शन करता येणार नसून Research Allotment Committee ने आचार्य पदवी मार्गदर्शक म्हणून शक्यतो संशोधकांना सुपूर्द करण्यात येऊ नये. मार्गदर्शक सेवानिवृत्त झाल्यास अश्या संशोधकांना संशोधक स्थळातील इतर मार्गदर्शक उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संशोधन स्थळाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी. असे मार्गदर्शक संशोधकांना देण्यात आल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबधित संशोधन केंद्र प्रमुखांची राहील.

३) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिशानिर्देशानुसार प्राध्यापकांना–८, सहयोगी प्राध्यापकांना–६ आणि सहायक प्राध्यापकांना –०४ पेक्षा जास्त संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

४) विद्यार्थ्यांकडून प्राप्त आवेदन संशोधन स्थळ प्रमुखांनी निर्देश क्रमांक ३२/२०१९ मधील तरतूदीनुसार Supervisor Allotment Committee गठीत करून प्राप्त आवेदनाची छाननी करून पात्र आवेदन समितीसमोर सादर करून मार्गदर्शक आणि रिक्त जागेची उपलब्धतेचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध करून देतील. मार्गदर्शक सेवानिवृत्त झाल्यानंतर नविन मार्गदर्शक संबधित संशोधन स्थळ प्रमुखाना विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. त्यामुळे निर्देश क्रमांक ३२/२०१९ मधील खालील तरतूद विचारात घेवून मार्गदर्शक पुरविण्याची कार्यवाही संशोधन स्थळ प्रमुखांनी घ्यावी.

Allocation of the Research Supervisor for an eligible research scholar shall be made by the committee taking into consideration the number of scholars already registered with the research supervisor, the specialization of the supervisors and research interest of the research scholar as indicated by him/her. While allotting the supervisor by the Research Supervisor Allocation Committee it shall bear in mind the requirement that Ph.D. thesis can be submitted only after expiry of the period of thirty six months from the date of registration. Therefore, as far as possible the committee shall not allot to the candidate the supervisor who is due for retirement before expiry of the above said period of thirty six months.

५) निर्देशातील तरतूदीनुसार सबंधित महाविद्यालयात Supervisor Allocation Committee खालीलप्रमाणे राहील. सदर समिती सबंधित संशोधन स्थळ असलेल्या महाविद्यालयांना आपल्या महाविद्यालयीन स्तरावर गठीत करावयाची आहे :

There shall be a Research Supervisor Allocation Committee (the committee) at every recognized research centre of the University. Such committee shall be constituted by the concerned Head of the Research Centre.

(i) Head of the Centre who shall be ex-officio Chairperson of the committee, provided the Head is having Ph.D. Degree)
(ii) Two senior recognized Ph.D. Supervisors in the concerned subject (Members).

६) संशोधकांना मार्गदर्शक उपलब्ध करून दिल्यानंतर Research Advisory Committee (RAC) संशोधन स्थळ प्रमुखांनी गठीत करावयाची आहे. आचार्य पदवी नोंदणीसाठी तयार केलेला आराखडा Research Advisory Committee मार्फत पाहणी करून आराखडयावर मार्गदर्शकाच्या स्वाक्षरीनंतर संशोधक, ऑनलाईन आवेदनपत्र सादर करतील व ऑनलाईन केलेल्या आवेदनाच्या हार्डकॉपीवर संशोधन स्थळ प्रमुख व मार्गदर्शकाची स्वाक्षरी घेऊन व आवश्यक प्रक्रिया पुर्ण करून आचार्य पदवी कक्षात ऑनलाईन आवेदनाची प्रत आवश्यक कागदपत्रासह सादर करतील.

७) **संबधित महाविद्यालयात Research Advisory Committee खालीलप्रमाणे राहील.**

There shall be Research Advisory Committee (RAC) at every place of research which shall consist of :

i) Head, University Teaching Department/ Director of the Institute of the University/Principal of the College/Head of the organization which is recognized research centre of the Uniersity in the subject or a group of subjects comprised in each Board of Studies (Ex-Officio Chairperson), provided he/she is having Ph.D. Degree.
ii) Two research supervisors in the subject or a group of subjects comprised in the Board of Studies, nominated by the Vice-Chancellor (Members)
iii) Recognised Research Supervisor of the concerned Ph.D. Scholar (Member) .

८) संशोधन स्थळात प्रवेश देतांना व मार्गदर्शक नेमतांना शासनाच्या आरक्षण नियमाचे तंतोतंत पालन करण्यात यावे. आचार्य पदवी नोंदणी करण्याकरिता प्राप्त आवेदनाच्या संदर्भात कोणत्याही प्राप्त तक्रारीवर संबधित संशोधन स्थळ प्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी व प्राप्त तक्रार निर्देशाच्या तरतूदीनुसार Grievances Redressal Cell कडे सुपूर्द करण्यात येईल.

९) निर्देश क्रमांक ३२/२०१९ मधील तरतूदीनुसार Grievances Redressal Cell खालीलप्रमाणे गठीत करण्यात येईल.

Redressal of disputes:

There shall be Grievance Redressal Committee consisting of the following members to address grievances of the research scholar, supervisors (including Co-supervisor) and Head Place of Research);

(i) Pro Vice-Chancellor (Chairman)
(ii) Dean of the concerned faculty
(iii) Nominee of the Vice-Chancellor
(iv) The Head, Place of Research (if the complaint is against the Head or the Dean, he/she shall not participate in the proceedings of the meeting of the committee as a member in such cases additional member/s may be nominated by the Vice-Chancellor

१०) महाविद्यालयांचे संशोधन स्थळ म्हणून नूतनीकरण (Renewal) झाले नसल्यास त्यांनी आचार्य पदवी नोंदणीकरिता विद्यार्थ्यांकडून आवेदन पत्र स्वीकारू नये व याबाबतची स्पष्ट कल्पना विद्यार्थ्यांना द्यावी.. अशा स्वरूपाचे आवेदनपत्र रद्द करण्यात येईल. याबाबत सर्वस्वी जबाबदारी संशोधन प्रमुख आणि विद्यार्थ्यांची राहील.

## ब) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रासोबत संलग्न करावयाची कागदपत्रे:

आवेदन पत्रासोबत खालील कागदपत्रे संलग्न करणे बंधनकारक आहे. अपूर्ण आवेदनपत्र आपोआप रद्द करण्यात येईल व अपूर्ण आवेदनकर्त्या विद्यार्थ्यांना संशोधन व मान्यता समितीसमोर सादरीकरणासाठी बोलविण्यात येणार नाही.

१) A copy of on Line Ph.D Registration Application Form with signature of Head, Place of Research and Signature of allotted guide by Place of Research.
२) आचार्य पदवी नोंदणी शुल्क रू. १०००/– ची पावती
३) पेट–१ आणि पेट–२ उत्तीर्ण प्रमाणपत्राची तसेच पेट परीक्षेपासून सुट प्राप्त असलेल्या प्रमाणपत्राची सत्यप्रत
४) पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेची गुणपत्रिकेची सत्यप्रत (पदव्युत्तर परीक्षेत खुल्या प्रवर्गाकरिता ५५ टक्के आणि राखीव प्रवर्गाकरिता ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे
५) ज्या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर गुणपत्रिका राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची नसेल अश्या प्रकरणामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र घेवून आवेदनपत्रासोबत मुळ पात्रता प्रमाणपत्र संलग्न करणे आवश्यक आहे.
६) ज्या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर गुणपत्रिका राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची नसेल अशा प्रकरणामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ परीक्षेत्रात राहण्याबाबत Executive Magistrate च्या स्वाक्षरीचे रहिवासी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
७) संशोधन आराखड्याची ७ प्रती
८) विद्यार्थीनीबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून निर्गमित नांव बदल अधिसूचनेची सत्यप्रत(विद्यापीठाच्या सामान्य परीक्षा व चौकशी विभागाकडून रितसर अर्ज सादर करून प्राप्त करून आचार्य पदवी कक्षात संबधित विद्यार्थ्याने प्रत्यक्ष सादर करावे.)
९) संशोधक सेवेत असल्यास नियोक्ताकडून आचार्य पदवी नोंदणी करण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्र तसेच पुर्णवेळ आचार्य पदवी करण्याकरिता आवेदन सादर केल्यास तीन वर्षाची रजा मान्य केल्याचे पत्र

**क) संशोधन स्थळ प्रमुखांनी विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रासोबत संलग्नित करावयाचे दस्तऐवज**

१) संशोधन स्थळ असलेल्या महाविद्यालयांकडून त्यांना विषयाकरिता संशोधन स्थळ म्हणून प्राप्त मान्यतेची/नुतनीकरण झाल्याची सत्यप्रत(राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग वगळून) (सदर कागदपत्रे संशोधनस्थळ प्रमुखांनी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून अनिवार्य आहे.)

२) संशोधन स्थळामध्ये प्रवेशित संशोधकांची यादी व रिक्त असलेल्या जागांची संख्येची माहिती संशोधन स्थळ प्रमुख यांच्या स्वाक्षरीसह (सदर कागदपत्रे संशोधन स्थळ प्रमुखांनी/प्राचार्य/विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे.)

३) Supervisor Allotment Committee च्या कार्यवृत्ताची प्रत (संशोधन स्थळ प्रमुख/प्राचार्य/विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे.)

४) Research Advisory Committee च्या कार्यवृत्ताची प्रत (संशोधन स्थळ प्रमुख/प्राचार्य/विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे.)

**ड) आचार्य पदवीसाठी मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रासोबत द्यावयाचे दस्तऐवज:**

१) मार्गदर्शकाकडे संशोधन करीत असलेल्या संशोधकांची यादी मार्गदर्शक आणि संशोधन स्थळ प्रमुख यांच्या स्वाक्षरीसह (मार्गदर्शकानी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे.)

२) मार्गदर्शक पदव्युत्तर शिक्षक मान्यताप्राप्त असल्याची सत्यप्रत (मार्गदर्शकानी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे)

३) मार्गदर्शक विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहायक प्राध्यापक असल्याबाबतचे पत्राची प्रत (मार्गदर्शकानी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे)

४) मार्गदर्शक मान्यतेची सत्यप्रत (मार्गदर्शकानी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे)

इ) <u>कार्यालयासाठी सुचना :</u>

१) आराखडा आणि आवश्यक कागदपत्रासह ऑनलाईन आवेदनाची हार्डकापी प्राप्त झाल्यानंतर विषयनिहाय तक्ता तयार करून संशोधन व मान्यता समितीच्या सभेचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करणे आवश्यक आहे. वेळापत्रकानुसार संशोधन व मान्यता समितीची सभा आयोजित करून समितीसमोर सादर करण्यात आलेल्या आराखडयावर सादरीकरणासाठी विद्यार्थ्यांना बोलविण्याची सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करून पुढील कार्यवाही करावी.

२) अपूर्ण आवेदनावर कोणत्याही प्रकारची पुढील कार्यवाही घेण्यात येणार नसून असे अपूर्ण आवेदनपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) आचार्य पदवी नोंदणी संदर्भात घेण्यात आलेली कार्यवाही संशोधकांना लवकरात लवकर विद्यापीठ संकेतस्थळामार्फत उपलब्ध करून देण्यात यावे.

(डॉ. अनिल हिरेखन)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर